नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

परभणी, कृषी हवामान सल्ला **मंगळवार, दिनांक: ०४ मे २०२१**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ०५ ते ०९ मे २०२१)				
दिनांक	०५/०५	०६/०५	०७/०५	०८/०५	०९/०५
पाऊस	०.०	०.०	४.०	४.०	१२.०
कमाल तापमान (अं.से.)	३९.०	४०.०	३९.०	३८.०	३८.०
किमान तापमान (अं.से.)	२६.०	२७.०	२७.०	२७.०	२७.०
ढग स्थिती (आकाश)	अंशत: ढगाळ	अंशत: ढगाळ	अंशत: ढगाळ	स्वच्छ	अंशत: ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	५९	६०	६०	६१	६२
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	२९	२८	३५	३६	३६
वा-याचा वेग (किमी / तास)	९	११	१९	५	७
वा-याची दिशा	पश्चिम-वायव्य	नैऋत्य	आग्नेय	दक्षिण	पश्चिम-वायव्य

हवामानाचा इशारा	हवामान अंदाजानुसार जिल्हयात दिनांक ५ ते ८ मे दरम्यान ठिकाणी वादळी वारा, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक राहून पावसाची शक्यता आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
संत्रा/मोसंबी	फळवाढीची अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसाची तसेच गारपीटीची शक्यता असल्यामुळे, नवीन लागवड केलेल्या व लहान झाडांना काठीचा आधार द्यावा.
हळद	काढणी अवस्था	सध्याच्या काळात उशीरा लागवड केलेल्या हळदीची काढणी, हळद उकडणे, वाळवणे, पॉलिश करणे ही कामे सुरू आहेत. वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, हळदीची उघडयावर साठवण करू नये.
ऊस	वाढीची अवस्था	ऊस पिकात खोड किडीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस 20 % २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल 18.5% ४मिली प्रति 10 लीटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी.
संत्रा/मोसंबी	फळवाढीची अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वाऱ्याचा वेग अधिक राहून तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, नवीन लागवड केलेल्या व लहान झाडांना काठीचा आधार द्यावा.
डाळिंब	फळवाढीची अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वाऱ्याचा वेग अधिक राहून तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, नवीन लागवड केलेल्या व लहान झाडांना काठीचा आधार द्यावा.
चिकू	काढणी अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वाऱ्याचा वेग अधिक राहून तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या चिकू फळांची काढणी करून घ्यावी. वाऱ्याचा वेग लक्षात घेता नवीन लागवड केलेल्या झाडांना काठीचा आधार द्यावा.

भाजीपाला	वाढीची/ काढणी अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार आसलेल्या भाजीपाला पिकांची तसेच टरबूज, खरबूज इत्यादी पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवण करावी.
फुल शेती	वाढीची अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व पावसासह तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असल्यामुळे, काढणीस तयार असलेल्या फुलपिकांची काढणी व प्रतवारी करून, ती बाजारपेठेत विक्रीस पाठवावी.
चारा पिके	वाढीची अवस्था	वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वाऱ्याचा वेग अधिक राहून तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, काढणी केलेल्या ज्वारीचा कडबा पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी. कारण पावसात भिजल्यास त्याची प्रत खालावून साठवण क्षमता कमी होते व भिजलेला कडबा जनावरे खात नाहीत.
पशुधन व्यवस्थापन	--	उन्हाळा ऋतू असला तरीही अधून मधून पडत असलेल्या पावसामुळे किटकवर्गीय माशा जसे की डास, क्यूलीकॉईडस्ईत्यादीचे प्रमाण वाढले आहे व त्यांचा प्रादुर्भाव पशुधनास जाणवत आहे. म्हणून अशि शिफारस करण्यात येते की पशुधनावर 5 % निंबोळी अर्क अथवा द्रावण (15मिली निंबोळी तेल + 15 मिली कारंज तेल + 2 ग्रॅम अंगाचा साबण + 1 लिटर पाणी खूप वेळ ढवळणे) पशुधनावरती फवारावे. वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वाऱ्याचा वेग अधिक राहून तुरळक ठिकाणी पावसासाची शक्यता असल्यामुळे, जनावरांना उघडयावर सोडू किंवा बांधू नये. निवा-याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. तसेच पाऊस चालू होण्याच्या वेळी झाडाच्या आडोशाला थांबु नये.
सामुदायिक विज्ञान	-	पळसाच्या फुलांची भुकटी पाण्यामध्ये उकळून त्यापासून रंग काढता येतो हा रंग सुती, रेशमी आणि उनी धागे रंगविण्यासाठी अनुक्रमे 10 %, 2% आणि 4 % या प्रमाणात घेऊन वापरता येतो. पळसाच्या फुलांपासून रंग काढण्यासाठी व धागे रंगविण्यासाठी 30 मिनिटांचा वेळ प्रमाणित करण्यात आला आहे. सुती धागे रंगविण्यापूर्वी, 10 % हरडयाच्या द्रावणात प्रक्रिया करणे गरजेचे आहे. तुरटी, क्रोम, कॉपर सल्फेट आणि फेरस सल्फेट या रंगबंधकाचा वापर करून फिका पिवळा ते गडद केशरी अशा विविध रंगछटा मिळतात. धुणे, घासणे, घाम आणि सुर्यप्रकाश या सर्व बाबीसाठी रंगाचा पक्केपणा अतिशय चांगला आहे.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.